# मटा मैफलीत रंगणार अभिवाचन

## 'रारंगढांग', 'नॉट विदाउट माय डॉटर'चा घेऊया पुनर्प्रत्यय



▸▸ पुणे टाइम्स टीम

'लेफ्टनंट विश्वनाथ मेहेंदळे?'

'येस सर...'

'युनायटेड कन्स्ट्रक्शनएवढ्या सुखयोयी आणि पगार तुम्हाला बॉर्डर रोडकडून मिळणार नाही.'

'माझ्या आवडीचं काम करायला तरी मिळेल.'

'आय डोंट नो! तुम्हाला कसल्या कामाची आवड आहे?'

'हिमालयात रस्ते बांधण्याची इच्छा आहे...'

लेफ्टनंट कर्नल राइट आणि विश्वनाथ मेहेंदळे यांच्यातला हा संवाद आणि पुढे तो रस्ता बांधण्याची सारी धडपड... सैन्य, त्यातील माणसं, त्यांच्यातलं माणूसपण, आपल्या अधिकाऱ्यांविषयी, आपल्या माणसांविषयी असलेली आत्मीयता, ती करडी शिस्त या सगळ्यांतून अतिशय वेगळा अनुभव देणारी 'रारंगढांग' ही भन्नाट कथा. प्रभाकर पेंढारकर यांचं १९८१ साली आलेलं




आणि आजही गाजणारं पुस्तक! याच पुस्तकाचं अभिवाचन तेही उत्तम पार्श्वसंगीतासह... म्हणजे मणिकांचन योगच! हा योग जुळून येणार आहे 'मटा मैफल'मध्ये! १७ जानेवारी रोजी संध्याकाळी ६.४५ वाजता हे अभिवाचन होणार आहे. रवींद्र बापट, मानसी फाटक, मंगेश दिवाणजी, किशोर वाघमारे, अमृत सामक, रवीराज कालेकर आणि प्रसिद्ध अभिनेता गिरीश परदेशी हे कलाकार हे अभिवाचन करणार आहेत. याचं दिग्दर्शन सरिता अनिरुद्ध यांनी केलं आहे. गोखले इन्स्टिट्यूटच्या निसर्गरम्य आणि प्रशस्त आवारातील प्रसिद्ध अशा ज्ञानवृक्षाखाली रसिक, कलाकार आणि प्रसिद्ध कादंबरी असा सुंदर मेळ जमेल.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित या खास 'मैफली'त साहित्यिकांच्या भेटीगाठी, परिसंवाद, काव्यकट्टा, अभिवाचन अशी साहित्यिक मेजवानी मिळणार आहे. येत्या शनिवार-रविवारी (दि. १७ व १८) दुपारी ३ ते रात्री ८ या वेळात ही 'मैफल' रंगणार आहे. तेव्हा, या दोन दिवसांत इतर काही प्लॅन्स करूच नका.

LIC प्रस्तुत मटा मैफल
BookGanga.com Creation | Publication | Distribution

## खिळवून ठेवणारं साहस

नॉट विदाउट माय डॉटर.. बेट्टी मेहमुदी आणि माहतोब मेहमुदी या दोघी मायलेकींनी इराणमधून १९८४ साली केलेल्या यशस्वी पलायनाची ही कथा.. इराणमधून आपल्या लेकीशिवाय पुन्हा अमेरिकेत जाणार नाही, असा निश्चिय केलेल्या, पलायनातले सगळे धोके माहिती असूनही धाडसानं केवळ लेकीसाठी पलायनाचा प्रयत्न करणाऱ्या बेट्टीची ही कथा तुम्हा आम्हा वाचकांना वाचताना खिळवून ठेवते. ही सारी कथा वाचताना जितकी रोमांचक वाटते, तितकीच ती अभिवाचनाच्या माध्यमातून आपल्या डोळ्यांसमोर अक्षरशः उभी राहते. हे अभिवाचन करणार आहेत, अंकिता गणपुले आणि तिचे सहकारी. कादंबरीचे नाट्यरूपांतर प्रणव बापट यानं केलं आहे. बेट्टीचे इराणमधील वास्तव्य, तिने भोगलेल्या यातना, तिने पळून जाण्यासाठी केलेले प्रयत्न, भोगलेल्या हालअपेष्टा या साऱ्या गोष्टींना एसपी कॉलेजची अंकिता आणि तिचे सहकारी आपल्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचवतात.

